मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शुक्रवार, दि. 27 मार्च 2026 | पान- 1


# पिंपरी-चिंचवडच्या विकासाचा ‘रोडमॅप’ तयार

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात महत्त्वाच्या मागण्यांना मंजुरी; आमदार अमित गोरखे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याच्या नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पिंपरी-चिंचवड शहराच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मांडण्यात यश आले आहे. केवळ प्रश्न मांडले नाहीत, तर मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडून त्याबाबत सकारात्मक कृती आराखडा आणि निधीचे ठोस आश्वासनही मिळवले आहे, अशी माहिती आमदार अमित गोरखे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.




राज्याच्या नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर आयोजित या विशेष पत्रकार परिषदेत आमदार गोरखे यांनी शहराच्या विकासासाठी उचललेल्या पावलांचा सविस्तर आढावा घेतला. शहराच्या विस्तारित भागातील रस्ते, उड्डाणपूल आणि पाणीपुरवठा योजनांसाठी राज्य शासनाकडून विशेष निधी मिळवण्यावर भर दिला असून, प्रशासकीय प्रक्रिया गतिमान करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, उपमहापौर शर्मिला बाबर, शहर सुधारणा समिती अध्यक्ष संजय (नाना) काटे, ज्येष्ठ नेते सदाशिव खाडे, राजू दुर्गे, नगरसेवक तुषार हिंगे, शितल उर्फ विजय शिंदे, कुशाग्र कदम, अमित गावडे, नगरसेविका श्रीमती अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, मधुरा शिंदे, दक्षिण भारतीय आघाडी प्रमुख राजेश पिल्ले, भाजपा मंडल अध्यक्ष धरम वाघमारे, भाजपा मंडल अध्यक्षा सौ.अनिता वाळूजकर, भाजपा चिटणीस नरेश पंजाबी, राजेंद्र बाबर, युवराज लांडे, देवदत्त लांडे, नंदू कदम, नेताजी शिंदे, सुनील पलांडे, सुनील कदम उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांची विशेष दाद

» सभागृहात पिंपरी-चिंचवडच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण मांडणी केल्याबद्दल राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी वैयक्तिकरीत्या कौतुक केले. एका लोकप्रतिनिधीसाठी आपल्या नेत्याकडून मिळालेली ही शाबासकी म्हणजे शहराच्या सेवेसाठी मिळालेली नवी ऊर्जा आहे. पिंपरी-चिंचवडला जागतिक दर्जाचे शहर बनवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. येत्या काळात रखडलेले सर्व प्रकल्प मार्गी लावून, शहराचा समतोल विकास साधणे हेच आमचे प्राथमिक ध्येय आहे, असेही आमदार गोरखे यांनी यावेळी नमूद केले.

> शहराच्या प्रलंबित प्रश्नांवर केवळ चर्चा न करता, ते तडीस नेण्यासाठी मी विधानपरिषदेत आवाज उठवला. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडमध्ये विकासाची गंगा घराघरांत पोहोचवू.
>
> \- अमित गोरखे, आमदार

# ‘एलपीएसी’ अंतर्गत दापोडी शून्य कचरा संकलन प्रकल्पासाठी अत्याधुनिक वाहन वितरण

## अत्याधुनिक संकलन वाहनामुळे प्लास्टिक कचरा व्यवस्थापनाला वेग; स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाला चालना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून प्लास्टिक कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याच्या दिशेने आणखी एक ठोस पाऊल उचलण्यात आले आहे. ‘समुदायांच्या माध्यमातून प्लास्टिक कृती स्थानिकीकरण (एलपीएसी)’ या अभिनव उपक्रमांतर्गत अत्याधुनिक प्लास्टिक कचरा संकलन वाहन आरोग्य विभागाला देण्यात आले. या उपक्रमामुळे शहरातील कचरा व्यवस्थापनाला नवी चालना मिळणार असून स्वच्छता अधिक प्रभावी होईल.



महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली तर उप आयुक्त डॉ.प्रदीप ठेंगल, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या अधिपत्याखाली दापोडी येथील विकेंद्रित साहित्य पुनर्प्राप्ती केंद्रात पार पडलेल्या या कार्यक्रमाला उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी पूजा दूधनाळे, सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, श्रीराम गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी, आरोग्य निरीक्षक सचिन जाधव यांच्यासह युमिकोअर ऑटोकॅट इंडिया प्रा. लि. चे राजीव कदम, अभिषेक कुलकर्णी, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांच्या उत्कर्षा कवडी, प्राची मेढे, श्रुती जोशी,

> एलपीएसी’ सारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे कचरा व्यवस्थापनात नागरिकांचा थेट सहभाग वाढत असून शाश्वत आणि पर्यावरणपूरक शहर उभारणीस गती मिळत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देत राहील.
>
> \- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> प्लास्टिक कचरा व्यवस्थापन ही केवळ यंत्रणांची जबाबदारी नसून नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय ती पूर्ण होऊ शकत नाही. ‘एलपीएसी’ उपक्रमामुळे स्थानिक स्तरावर कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण आणि पुनर्वापर सुलभ होणार असून पिंपरी चिंचवड शहर अधिक स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्यास मोठी मदत होईल.
>
> \- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

(उर्वरित पान २ वर)

# भामा आसखेड धरण पाणीपुरवठा प्रकल्पाची पाहणी

## भामा आसखेड प्रकल्पाला गती; भविष्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी महापौर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना शुद्ध,मुबलक व शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेता भामा आसखेड पाणीपुरवठा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असून हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करा, असे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

पिंपरी चिंचवड शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना मुबलक व नियमित पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने राबविण्यात येत असलेल्या भामा आसखेड धरण पाणीपुरवठा योजना प्रकल्पाची आज महापौर रवि लांडगे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. यावेळी बोलत होते.

या पाहणीदरम्यान उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे, कुणाल वाव्हळकर, शेखर चिंचवडे,नवनाथ जगताप यांच्यासह महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता अनिल भालसाखळे, महेश कावळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौर यांनी प्रकल्पातील विविध कामांचा आढावा घेतला. मौजे वाकी तर्फे वाडा येथे उभारण्यात येत असलेल्या अशुद्ध जल उपसा केंद्राच्या कामाची त्यांनी पाहणी करून तेथून दररोज १६७ दशलक्ष लिटर पाणी कशा प्रकारे शहरासाठी उपलब्ध होणार आहे याची माहिती घेतली. तसेच या उपसा केंद्रापासून तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँकपर्यंत टाकण्यात येणाऱ्या ७.३० किलोमीटर लांबीच्या १७०० मि.मी. व्यासाच्या रायझिंग मेन जलवाहिनीच्या कामाच्या प्रगतीचाही आढावा घेतला.

तसेच नऊलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर टँकच्या उभारणी संदर्भात आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती घेत महापौरांनी लवकरात लवकर प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्याच्या सूचना दिल्या. यानंतर चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत टाकण्यात येणाऱ्या १८.८० किलोमीटर लांबीच्या १४०० मि.मी. व्यासाच्या ग्रॅव्हिटी मेन जलवाहिनीच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला. तसेच चिखली येथे उभारण्यात येणाऱ्या २०० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राच्या कामाची माहिती घेताना महापौरांनी हायड्रॉलिक, जीआय आणि स्ट्रक्चरल डिझाईनबाबत अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती जाणून घेतली.

महापौर रवि लांडगे यावेळी म्हणाले, पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेता भामा आसखेड पाणीपुरवठा प्रकल्पामुळे शहरातील अनेक भागांतील पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागणार आहे. त्यामुळे प्रकल्पातील सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे. कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करून शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावा, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी शहरातील पाणीपुरवठा हा अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील विषय असून, या प्रकल्पाच्या माध्यमातून भविष्यातील पाणी गरजांची पूर्तता करण्यासाठी भक्कम पायाभूत सुविधा उभारल्या जात असल्याचे नमूद केले, आयुक्तांनी प्रकल्पातील विविध घटकांची प्रत्यक्ष पाहणी करून कामांची सद्यस्थिती, प्रगती आणि तांत्रिक बाबींची त्यांनी सविस्तर माहिती घेतली तसेच भामा आसखेड प्रकल्प हा शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी निर्णायक ठरणार असून, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. महापौर यांनी दिलेल्या सूचनांनुसार सर्व कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांना स्पष्ट निर्देश त्यांनी

### भामा आसखेड प्रकल्पाला गती

» पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर भामा आसखेड पाणीपुरवठा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. महापौर रवि लांडगे यांनी प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करून कामांना गती देण्याचे निर्देश दिले. शहराला शुद्ध, मुबलक आणि शाश्वत पाणीपुरवठा करण्यासाठी हा प्रकल्प निर्णायक ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रकल्पातील सर्व कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे.

### जलशुद्धीकरण केंद्राची उभारणी

» चिखली येथे २०० दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात येत आहे. या केंद्रामुळे शहरातील अनेक भागांतील पाणीटंचाई दूर होण्यास मदत होणार आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हा प्रकल्प दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वाचा असल्याचे सांगितले. सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

# घरगुती सिलिंडरमधून बेकायदेशीर गॅस चोरीचा पर्दाफाश

## पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने कारवाई केली.



**पिंपरी | प्रतिनिधी**

घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरमधून अवैधरित्या गॅसची चोरी करून तो दुसऱ्या सिलिंडरमध्ये भरणाऱ्यावर पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने कारवाई केली. ही घटना चऱ्होली बुद्रुक येथे घडली.

या प्रकरणी पोलीस शिपाई समीर रासकर यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी २८ वर्षीय तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी घरगुती गॅस सिलिंडरमधून नोझलच्या साहाय्याने गॅस काढून घेत होता. लोकांच्या जीविताला धोका निर्माण होईल हे माहित असूनही त्याने सुरक्षेची कोणतीही काळजी घेतली नाही. पोलिसांनी त्याच्याकडून ९ हजार ८०० रुपये किमतीचा अवैध गॅस साठा जप्त केला आहे. दिघी पोलीस तपास करत आहेत.

मोठ्या घरगुती गॅस सिलिंडरमधून छोट्या टाक्यांमध्ये बेकायदेशीरपणे गॅस भरणाऱ्या एका व्यक्तीवर पोलिसांनी कारवाई केली आहे. ही कारवाई मंगळवारी (२४ मार्च) रात्री भोसरीतील हनुमान मंदिर परिसरात करण्यात आली. ज्वालाग्राही पदार्थाबाबत कोणतीही खबरदारी न घेता लोकांच्या जीविताला धोका निर्माण केल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावरून गॅस टाक्या आणि इतर साहित्यासह २८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. भोसरी पोलीस तपास करत आहेत.

# 'एलपीएसी' अंतर्गत दापोडी शून्य कचरा संकलन प्रकल्पासाठी अत्याधुनिक वाहन वितरण

( पान १ वरून )

युनिसेफचे प्रतिनिधी जसप्रीत गुरुम, आनंद घोडके यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, युवक, महिला, नागरिक उपस्थित होते.

स्थानिक समुदायाच्या सक्रिय सहभागातून प्लास्टिक कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण आणि पुनर्वापर अधिक परिणामकारक करण्याचा मुख्य उद्देश असलेल्या या प्रकल्पाची अंमलबजावणी ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई यांच्या माध्यमातून करण्यात येत असून, युनिसेफ महाराष्ट्र आणि युमिकोअर ऑटोकॅट इंडिया प्रा. लि. यांचे सहकार्य या उपक्रमाला लाभले आहे. विविध संस्थांच्या समन्वयातून साकारलेला हा उपक्रम शहरासाठी एक आदर्श मॉडेल ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच एलपीएसी प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा सादर करण्यात आला आणि नव्या संकलन वाहनाचे औपचारिक हस्तांतरण यावेळी करण्यात आले.

यानंतर मान्यवरांनी साहित्य पुनर्प्राप्ती केंद्राची पाहणी करून तेथील कार्यपद्धतीची माहिती घेतली. स्वयं-सहायता गटातील महिलांशी व विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या योगदानाचे कौतुक करण्यात आले आणि कचरा व्यवस्थापनातील त्यांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच नवीन संकलन वाहनामुळे पिंपरी चिंचवड शहरातील प्लास्टिक कचरा संकलन व प्रक्रिया अधिक वेगवान, कार्यक्षम आणि शाश्वत होणार आहे. अशी माहिती देखील यावेळी देण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्कर्षा कवडी यांनी तर सूत्रसंचालन प्राची मेढे यांनी केले.

# पिंपरीत न्याय, मग पुण्यात अन्याय का? निवडणूक भत्त्यावरून वाद

## भत्त्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी वेगवेगळे नियम; जाचक अटी व शर्ती लावण्यात आल्याने कर्मचारी नाराज

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या निवडणुका होऊन दोन महिने झाले असले, तरी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना जादा वेळ काम केल्याबद्दल दिला जाणारा मोबदला अद्याप दिलेला नाही. हा मोबदला देताना निवडणूक विभागाकडून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी वेगवेगळी नियमावली लागू करण्यात आली आहे. मात्र, कर्मचाऱ्यांना हा भत्ता देण्यासाठी जाचक अटी व शर्ती लावण्यात आल्याने कर्मचारी नाराज आहेत.

प्रशासनाने तातडीने हे नियम रद्द करून सर्वांना समान पद्धतीने भत्ता द्यावा, अशी मागणी पीएमसी एम्प्लॉयी युनियनच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे करण्यात आली आहे. जानेवारी २०२६ मध्ये महापालिका निवडणुका पार पडल्या. यासाठी महापालिकेकडून वेगवेगळ्या टप्प्यांवर सुमारे २० हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जुलै २०२५ च्या मूळ वेतनानुसार अतिकालिक भत्ता,

परिश्रमिक भत्ता आणि मानधन देण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. मात्र, निवडणुका पार पडल्यानंतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या जादा कामाच्या तासांचा मोबदला देताना प्रशासनाकडून दिवसाला केवळ तीन तास आणि एकूण कालावधीत जास्तीत जास्त १६५ तासांपर्यंतच मोबदला देण्याचे आदेश काढले आहेत. याशिवाय त्यासाठी मोठ्या प्रमाणावर अटी व शर्ती घातल्याने कर्मचाऱ्यांना मानधन मिळविताना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिकेत अधिकारी आणि कर्मचारी असा कोणताही भेदभाव न करता निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार संबंधित भत्ते देण्यात येत आहेत. त्याच धर्तीवर पुणे महापालिकेतही सर्वांना समान लाभ द्यावा, तसेच निवडणूक विभागाने काढलेले संबंधित आदेश व परिपत्रके रद्द करावीत, अशी मागणी संघटनेने केली आहे. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना जादा वेळ काम केल्याबद्दल दिला जाणारा मोबदला अद्याप दिलेला नाही. हा मोबदला देताना निवडणूक विभागाकडून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी वेगवेगळी नियमावली लागू करण्यात आली आहे. मात्र, कर्मचाऱ्यांना हा भत्ता देण्यासाठी जाचक अटी व शर्ती लावण्यात आल्याने कर्मचारी नाराज आहेत.



### जाचक अटींमुळे अडचणी

» प्रशासनाने मोबदला देताना दिवसाला फक्त तीन तास आणि एकूण १६५ तासांची मर्यादा निश्चित केली आहे. याशिवाय विविध अटी-शर्ती घालण्यात आल्याने कर्मचाऱ्यांना भत्ता मिळविताना अडचणी येत आहेत. या नियमांमुळे मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली आहे.

### मोबदला रखडल्याने नाराजी

» पुणे महापालिकेच्या निवडणुका होऊन दोन महिने उलटले तरी कर्मचाऱ्यांना जादा कामाचा मोबदला मिळालेला नाही. निवडणूक काळात सुमारे २० हजार कर्मचाऱ्यांनी विविध टप्प्यांवर काम केले होते. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार भत्ते देणे अपेक्षित असतानाही प्रत्यक्षात विलंब होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

### समान भत्त्याची मागणी

» पिंपरी-चिंचवड महापालिकेत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना समान पद्धतीने भत्ते दिले जात असल्याचा दाखला देत पुण्यातही तशीच अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवडणूक विभागाचे आदेश रद्द करून सर्वांना समान लाभ द्यावा, असे संघटनेने आयुक्तांकडे पत्राद्वारे मागितले आहे.

# मेट्रोखालीच वाहनतळ! कसबा पेठेत बेकायदा पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

## मेट्रो स्टेशनखाली अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडी; प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील मेट्रो स्टेशनच्या खालील रस्त्यावर अनेक जण चारचाकी, दुचाकी, रिक्षा, टेम्पो थेट रस्त्यावर लावून जातात तर काही जण चक्क चारचाकी लावून बिनधास्तपणे तासन् तास थांबलेले दिसतात. त्यामुळे पुण्यात नवीन वाहनतळ निर्माण झाले की काय? असा प्रश्न येणाऱ्या जाणाऱ्यांना पडत असून, महापालिका प्रशासनचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशांकडून संताप व्यक्त होत आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागातील अगदी पुणे महानगरपालिकेसमोर असलेल्या बसथांब्यावर असंख्य बसथांबे आहेत. या बसथांब्यांवरून दररोज शहर, उपनगर आणि पिंपरी चिंचवडला जाणाऱ्या असंख्या बस धावतात. मात्र, या ठिकाणी मागील काही महिन्यांपासून अनेक वाहनचालक आपली वाहने बिनधास्त मेट्रो स्टेशनखाली लावून जातात. त्यामुळे हा रस्ता अरुंद होऊन वाहतूक रहदारी मंदावते.

सकाळ व संध्याकाळी घाईच्या वेळीस कोंडी होत असल्याचे पाहावयास मिळते. त्यामुळे नक्की मेट्रो वाहतूक सुरळीत करण्यासाठी आहे की कोंडीत भर टाकण्यासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या असंख्य बसथांब्यावरून रोज हजारो नोकरदारवर्ग, शाळा, महाविद्यालय विद्यार्थी, नागरिक, महिला लहान मुले या बसथांब्यावरून प्रवास करत असतात. त्यामुळे या स्वयंघोषित वाहनतळामुळे या रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.




### वाहतूक कोंडीत भर

» या भागातून शहर व उपनगरांकडे जाणाऱ्या अनेक बस धावतात. मात्र, रस्त्यावर उभ्या केलेल्या वाहनांमुळे रस्ता अरुंद झाला आहे. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत येथे तीव्र कोंडी होत असून वाहतूक मंदावते. मेट्रोमुळे वाहतूक सुरळीत होण्याऐवजी कोंडीतच भर पडत असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

### अपघाताचा धोका वाढला

» दररोज हजारो नोकरदार, विद्यार्थी, महिला आणि नागरिक या बसथांब्यावरून प्रवास करतात. मात्र, रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांमुळे पादचाऱ्यांना मार्ग काढणे कठीण झाले आहे. या परिस्थितीत अपघाताचा धोका वाढला असून तातडीने कारवाई करून वाहतूक शिस्त लावावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.


# खडकवासला परिसरात डोंगरांची बेकायदा तोड

## फार्महाऊस व प्लॉटिंगसाठी डोंगर पोखरण्याचा सपाटा; पूर व मानव-वन्यजीव संघर्षाचा वाढता धोका

**पुणे | प्रतिनिधी**

ऐतिहासिक वारसा आणि निसर्गसंपन्नता लाभलेल्या हवेली तालुक्यातील डोंगररांगा सध्या विकसकांच्या विळख्यात सापडल्या आहेत. जांभळी, सोनापूर, आंबी, घेरासिंहगड आणि खामगाव परिसरात फार्म हाऊस आणि गुंतवणुकीच्या नावाखाली डोंगरांची अक्षरशः लचकेतोड सुरू असून, पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. प्रशासनाचे नियम धाब्यावर बसवून जेसीबीच्या साहाय्याने डोंगर पोखरण्याचे काम जोमात सुरू आहे.

प्लॉटिंगच्या हव्यासापोटी डोंगरावरून पावसाचे पाणी वाहून नेणारे नैसर्गिक नाले बुजविण्यात आले आहेत. ओढ्यांचे प्रवाह बदलल्यामुळे पावसाळ्यात या भागात पूरस्थिती उद्भवण्याचा आणि दरडी कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी मुख्य रस्त्यालगतच संरक्षक भिंती बांधून नैसर्गिक पाण्याचे मार्ग रोखण्यात आले आहेत.



### नावापुरतीच दंडात्मक कारवाई

» डोंगर पोखरण्याचे काम उघडपणे सुरू असतानाही महसूल आणि वन विभाग केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करीत आहेत. काही ठिकाणी नावापुरती दंडात्मक कारवाई केली जाते. मात्र, मूळ डोंगर पुन्हा पूर्ववत होऊ शकत नाही. जर वेळीच कठोर पावले उचलली नाहीत, तर या भागाचे सौंदर्य केवळ फोटोंपुरतेच मर्यादित राहील, अशी खंत व्यक्त होत आहे.

खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रालगत असलेल्या गावांमध्ये डोंगरांवरील नैसर्गिक उतार कापून जमीन सपाट केली जात आहे. नियमानुसार डोंगराचा उतार कापण्यास बंदी असतानाही बेकायदा उत्खनन करून निसर्गसंपत्ती नष्ट केली जात आहे. पुणे रिंगरोडच्या कामात आधीच मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली असताना आता खासगी प्लॉटिंगमुळे उरलीसुरली वनसंपदाही संपुष्टात येत आहे. या भागात आढळणाऱ्या दुर्मीळ वनौषधी आणि स्थानिक वृक्षांची मोठ्या प्रमाणावर कत्तल केली जात आहे. नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे बिबट्या, भेकर, मोर आणि ससा यांसारखे वन्यजीव आता मानवी वस्तीकडे वळू लागले आहेत. यामुळे भविष्यात मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र होण्याची भीती व्यक्त होत आहे.

डोंगर पोखरण्याचे काम उघडपणे सुरू असतानाही महसूल आणि वन विभाग केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करीत आहेत. काही ठिकाणी नावापुरती दंडात्मक कारवाई केली जाते. मात्र, मूळ डोंगर पुन्हा पूर्ववत होऊ शकत नाही. जर वेळीच कठोर पावले उचलली नाहीत, तर या भागाचे सौंदर्य केवळ फोटोंपुरतेच मर्यादित राहील, अशी खंत व्यक्त होत आहे. पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. प्रशासनाचे नियम धाब्यावर बसवून जेसीबीच्या साहाय्याने डोंगर पोखरण्याचे काम जोमात सुरू आहे.

### पूरस्थिती उद्भवण्याचा धोका

» प्लॉटिंगच्या हव्यासापोटी डोंगरावरून पावसाचे पाणी वाहून नेणारे नैसर्गिक नाले बुजविण्यात आले आहेत. ओढ्यांचे प्रवाह बदलल्यामुळे पावसाळ्यात या भागात पूरस्थिती उद्भवण्याचा आणि दरडी कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी मुख्य रस्त्यालगतच संरक्षक भिंती बांधून नैसर्गिक पाण्याचे मार्ग रोखण्यात आले आहेत.

“ नियमबाह्य डोंगरफोड सुरू असलेल्या ठिकाणी तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या आणि अनधिकृत उत्खनन करणाऱ्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

\- डॉ. अर्चना निकम, तहसीलदार, हवेली

# बांधकामाच्या वेळेत मोठा बदल! आता ‘या’ वेळेत चालणार कामे

## रेराच्या अटी आणि जड वाहतुकीच्या अडचणींमुळे बांधकाम व्यावसायिकांनी केली होती मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

बांधकाम प्रकल्पांना दोन तासांची वाढ देऊन बांधकाम व्यावसायिकांना महापालिकेने दिलासा दिला आहे. याआधी सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेतच बांधकाम प्रकल्पांची कामे करण्याला परवानगी देण्यात आली होती. ती आता दोन तासांनी वाढवली असून, नवीन नियमानुसार सकाळी सात ते रात्री आठ या वेळेत कामे पूर्ण करता येणार आहे. नगर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी हे आदेश काढले आहेत.

पुणे महापालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी सध्या मोठ्या प्रमाणावर इमारत बांधकामे, खोदकामे सुरू असून, या कामांमुळे मोठ्या प्रमाणात हवा आणि ध्वनिप्रदूषण होते. सकाळी लवकर अणि रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या बांधकामामुळे प्रदूषणात अधिक वाढ होत असून, शहरातील हवा गुणवत्ता निर्देशांक खालावत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत

या प्रदूषणाबाबत स्थानिक नागरिकांकडून वेळोवेळी महापालिकेकडे तक्रारी प्राप्त होत आहेत. अनेक नागरिकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (एमपीसीबी) तक्रारीही केल्या आहेत. त्यानुसार एमपीसीबीनेही महापालिकेला यासंदर्भात आदेश दिले होते. या प्रकारे धुळीचे साम्राज्य आणि बांधकाम नियमांचे पालन न केल्याप्रकरणी एका बांधकाम व्यावसायिकांना नोटीस देऊन त्यांचे कामही थांबवले होते.

त्यामुळे महापालिकेने यासंदर्भात कार्यवाही करत, बांधकाम करण्यासाठी वेळेची मर्यादा घातली होती. गेल्या महिन्यात सकाळी आठ ते रात्री आठ याच वेळेत बांधकाम सुरू ठेवण्याचे निर्देश दिले होते. ठरवलेल्या वेळेआधी आणि नंतर काम सुरू राहिल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला होता. मात्र, बांधकाम वेळेत पूर्ण करण्याच्या रेराच्या अटी, ग्राहकांविषयीची बांधिलकी या सगळ्या गोष्टींमुळे बांधकाम व्यावसायिकांनी या वेळेबाबत नाराजी दर्शविली होती.



### बांधकाम वेळेत बदल

» पुणे महापालिकेने बांधकाम प्रकल्पांच्या कामकाजाच्या वेळेत दोन तासांची वाढ करून बांधकाम व्यावसायिकांना दिलासा दिला आहे. यापूर्वी सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेतच काम करण्यास परवानगी होती. आता नवीन नियमानुसार सकाळी सात ते रात्री नऊ या वेळेत काम करता येणार आहे. प्रदूषणाच्या तक्रारींमुळे आधी वेळ मर्यादित करण्यात आली होती; मात्र व्यावसायिकांच्या मागणीनुसार ही सवलत देण्यात आली. नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाईचा इशाराही कायम ठेवण्यात आला आहे.